प्रेस नोट दिनांक ०४/०६/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## महिलेचा हरवलेला मोबाईल हँडसेट सुस्थितीत परत दिला

दि.०२/०६/१९ रोजी रात्रौ १०.३० वा. चे सुमारास पोहवा. ६३८३, राजु कांबळे हे रात्रपाळी डयुटीस हजर असतांना त्यांचेकडे रिक्षाचालक नामे श्री. महेश जनार्धन गायकवाड, रा. माळवाडी, वडगांवशेरी, पुणे यांनी एचटीसी कंपनीचा मोबाईल हँडसेट हजर करुन तो खराडी, बायपास येथे सापडला असल्याचे सांगितले. पोहवा. कांबळे यांनी सदर मोबाईलचे चार्जींग संपले असल्याने चार्जींग करुन त्यावर झालेल्या कॉलवरुन मोबाईलचे मालकांचा शोध घेवुन तो महिला नामे शिवानी पारे, रा. वाघोली,पुणे, हयांचा असलेची माहिती मिळाली. त्यांना मोबाईल ताब्यात घेणेसाठी आज रोजी बोलाविले असता त्या दुपारी १५.३० वा. चे सुमारास त्यांचे मैत्रीणीसह हजर झाल्या. त्यावेळी त्यांनी सांगितले की, काल रोजी त्यांचा एचटीसी कंपनीचा मोबाईल हँडसेट सायंकाळी ०५.३० वा. चे सुमारास खराडी, बायपासरोड, पुणे येथे हरवलेला होता, परंतु त्याचे चार्जींग संपलेले असल्याने तो लागत नव्हता, असे त्यांनी सांगितले. सदर मोबाईल शिवानी पारे यांचाच असलेची खात्री करुन पोहवा. राजु कांबळे व मपोना. तृप्ती काळे यांनी सदरचा मोबाईल त्यांचे ताब्यात सुस्थीतीत दिलेला आहे. शिवानी पारे यांनी त्यांचा मोबाईल हँडसेट अल्पाधीत परत मिळाल्याने त्यांना आनंद होवुन, त्यांनी रिक्षाचालक व पोलीसांचे कौतुक करुन आभार व्यक्त केले आहेत.

